# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :–596/शि.वि./सशिअ दिनांक – 05/06/2015

अतितात्काळ/महत्वाचे/प्राधान्याने

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय :– शैक्षणिक सत्र 2015–16 करीता इ. 1 ते 8 ची पाठयपुस्तके व इ. 6 ते 8 ची स्वाध्यायपुस्तिकांची उचल करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सर्व शिक्षा अभियानातंर्गत शैक्षणिक सत्र 2015–16 करीता इयत्ता 1 ते 8 च्या सर्व माध्यमाची पाठयपुस्तके आणि इयत्ता 6 ते 8 ची स्वाध्यायपुस्तिका बालभारती नागपूर कडून प्राप्त झालेली असून परिपत्रकात दर्शविण्यात आलेल्या वेळापत्रकानूसार '**एम. ए. के. आझाद उर्दू माध्यमिक शाळा, आशिनगर झोन क्र. 9, म.न.पा. नागपूर** येथून संबंधित शाळा निरीक्षक/शहर साधन केंद्र समन्वयक, साधनव्यक्ति यांच्या मार्फत वाटप करण्यात येत आहे.

आपण परिपत्रकात दिलेल्या तारखेस झोन निहाय व माध्यम निहाय दिलेल्या वेळेवर वाटप केंद्रावर उपस्थित राहावे. सोबत मुख्याध्यापकाचा शिक्का पाठयपुस्तके व स्वाध्यायपुस्तिका सुरक्षित शाळेत नेण्याकरीता आवश्यक साहित्य इयत्ता निहाय पटसंख्येचा तक्ता सोबत आणावे, पाठयपुस्तके/स्वाध्यायपुस्तिकांची संख्या, व माध्यम यांची उचल करतांना वाटप केंद्रावरच खात्री करून घ्यावी. उचल करण्यात आलेल्या पाठयपुस्तकांवर "**सर्व शिक्षा अभियान मोफत पुस्तक वाटप**" असा शिक्का लावावा. वाटपाची नोंद रजिष्टर मध्ये घ्यावी. शाळा सुरूवातीच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके वितरीत करण्याचे शासनाचे निर्देश आहेत यात दिरंगाई केल्यास संबंधित शाळेचे मुख्याध्यापक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

वाटप केंद्र ते शाळेपर्यंत पाठयपुस्तकांची वाहतुक करताना 1.20 पैसे प्रति किलो दराने झालेल्या खर्चाचे देयके, पोहोच पावती संबंधित शहर समूह साधन केंद्रावर जमा करावी. वाहतूकी करीता आलेला खर्च मंजूर झाल्यानंतर आपणांस रक्कम अदा करण्यात येईल.

कृ.मा.प.

# पाठयपुस्तके / स्वाध्यायपुस्तिका वाटपाचे झोन व माध्यम निहाय वेळापत्रक

| दिनांक | झोन क्र. | माध्यम | वाटपाची वेळ | वाटप करणाऱ्यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| 8 / 6 / 2015 | 1 | मराठी | सकाळी 10 ते 12 | **अ)** शाळा निरिक्षक<br>1) श्री. धनराज दाभेकर (9423201706)<br>2) श्री. संजय दिघोरे (9923760814)<br>3) श्री. सुभाष लाडे (9923164877)<br>4) श्री. काजी मुजाउद्दीन (9326813963)<br>**ब)** यूआरसी.<br>1) श्री. राजेंद्र धाईत<br>2) श्री. शेषराव उपरे<br>3) श्री. संजय भाटी<br>4) श्री. प्रमोद गायकवाड<br>**क)** साधनव्यक्ति<br>1) श्री. वामन कोंडेकर (7122559807)<br>2) श्री. योगेश वडाकोंडलवार (9767660362)<br>3) श्री. ज्ञानेश्वर दिपटे (8275397975) |
| | 1 | हिंदी | दुपारी 12 ते 1 | |
| | 10 | मराठी | दुपारी 1 ते 2 | |
| | 10 | हिंदी + उर्दू | दुपारी 2 ते 3 | |
| 9 / 6 / 2015 | 2 | मराठी | सकाळी 10 ते 11 | |
| | 2 | हिंदी | सकाळी 11 ते 1 | |
| | 9 | उर्दू | दुपारी 1 ते 3 | |
| 10 / 6 / 2015 | 3 | मराठी | सकाळी 10 ते 11 | |
| | 3 | हिंदी | सकाळी 11 ते 12 | |
| | 9 | इंग्रजी / हिंदी | दुपारी 12 ते 2 | |
| 11 / 6 / 2015 | 4 + 9 | मराठी | सकाळी 10 ते 12 | |
| | 4 | हिंदी | दुपारी 12 ते 1 | |
| | 5 | हिंदी व उर्दू | दुपारी 1 ते 3 | |
| 12 / 6 / 2015 | 5 + 6 | मराठी | सकाळी 10 ते 12 | |
| | 6 | हिंदी | दुपारी 12 ते 2 | |
| 13 / 6 / 2015 | 6 + 7 + 8 | उर्दू | सकाळी 10 ते 12 | |
| 15 / 6 / 2015 | 7 | मराठी | सकाळी 10 ते 12 | |
| | 7 | हिंदी | सकाळी 12 ते 2 | |
| 16 / 6 / 2015 | 8 | मराठी | सकाळी 10 ते 12 | |
| | 8 | हिंदी | दुपारी 12 ते 3 | |

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर